---------------------------------------------------------------------------------

सासू : अगं सूनबाई, उठ आता..
सूर्य उगवला सुद्धा.

सून : तुम्हाला फक्त तेवढंच दिसणार...
सूर्य माझ्या अगोदर झोपायला जातो ते दिसत नाही.

---------------------------------------------------------------------------------

सासू : किती वेळा सांगितलं बाहेर जाताना टिकली लावत जा.

सूनबाई : अहो सासूबाई, जीन्सवर कुणी टिकली नाही लावत.

सासू : अगं जीन्सवर नाही, कपाळावर लाव, भवाने..!

---------------------------------------------------------------------------------

घर आवरताना सासूबाईंना सुनेचा बायो-डेटा सापडतो.

जो तिने लग्नासाठी तयार केलेला होता.

त्यात आवड या रकान्यात...

“स्वयंपाक करण्याची भयंकर आवड आहे.” असं लिहिलेलं असतं.

सासूबाईं त्यात दुरुस्ती करतात...

“भयंकर स्वयंपाक करण्याची आवड आहे.”

सासूबाई मराठीच्या शिक्षिका होत्या.

---------------------------------------------------------------------------------